MHBU170002062026

**कि. फौ. अर्ज क्रं.१३/२०२६**
**कैलास मवाळ वि. महाराष्ट्र शासन**

## निशाणी क्रमांक ०१ वरील आदेश

(दिनांक १६/०३/२०२६)

०१) अर्जदाराने प्रस्तुतचा अर्ज, भारतीय नागरिक सुरक्षा संहिता, २०२३ चे कलम ५०३ नुसार दाखल केलेला आहे. त्यानुसार अर्जदाराने त्याची मालकीची मारुती व्हीटेरा ब्रेझा, झेड.डी.आय+ कार जिचा आर.टी.ओ. पासींग क्र. MH-28-AZ-7778 इंजिन क्रमांक D13A-5547801 व चेचीस क्रमांक MA3NYFB1SHL312751 पोलीसांनी जप्त केलेल्या वाहनाचा अंतरीम ताबा त्याला देण्यात यावा अशी विनंती केली आहे.

०२) अर्जदाराचे थोडक्यात कथन असे आहे की, तो वरील नमूद **वाहनाचा** कायदेशीर मालक व कब्जेदार आहे. सदर **वाहन** पोलीस स्टेशन, मेहकर यांनी गुन्हा नोंद क्र.११५/२०२६ बी.एन.एस कलम १०६(१), १२५(बी), २८१, ३२४(४) या गुन्हयामध्ये जप्त केलेली आहे. सदर **वाहनाचा** उपयोग तो दैनदिन कामासाठी तसेच घरघुती कामासाठी करतो. सदर **वाहन** पोलीस स्टेशन, मेहकर यांनी जप्त केले असल्यामुळे अर्जदाराला गैरसोय निर्माण झाली आहे. सदर **वाहन** हे पोलीस स्टेशन, मेहकर यांनी बंद अवस्थेत ठेवल्यास ते खराब होण्याची दाट शक्यता आहे. त्यामुळे अर्जदाराचे अतोनात नुकसान होईल म्हणुन अर्जदाराने जप्त **वाहन** त्याच्या ताब्यात देण्याची विनंती केली आहे.

०३) प्रस्तुत प्रकरणी सहायक सरकारी अभियोक्ता व तपासी अंमलदार यांचे म्हणणे मागविण्यात आले. सहायक सरकारी अभियोक्ता यांनी निशाणी क्र.०१ वर म्हणणे मांडले की, सदर वाहन हे वरील गुन्हयामध्ये जप्त करण्यात आले आहे. तसेच सदर वाहन पुराव्याचा महत्वाचा भाग आहे. सदरचे वाहन अर्जदाराला दिल्यास तो पुन्हा अशा प्रकाराचा गुन्हा करण्याची, वाहन विकण्याची व पुरावे नष्ठ करण्याची शक्यता नाकारता येत नाही. करिता सदरचा अर्ज नामंजुर करण्यात यावा.

०४) तपासी अंमलदार यांनी निशाणी क्रंमाक ०५ वर म्हणणे मांडले आहे की, सदर वाहनाची आर. टी. ओ. बुलडाणा यांचे कडुन तांत्रीक तपासणी करण्यात आली आहे. तसेच अर्जदार याने विद्येमान कोर्टाने दिलेल्या अटी शर्तीचे आदेशाचे पालन केल्यास सदर अटींवर सदर वाहन हे अर्जदार याच्या ताब्यात द्यावे.

०५) अर्जदाराने अभिलेखावर आधार कार्डची प्रत, प्रथम खबरी अहवालाची प्रत, व्हेईकल पर्टीकुलर्सची प्रत, इन्शुरंसची प्रत, ड्राव्हींग लायसन्स, इत्यादी कागदपत्रे दाखल केलेली आहेत.

०६) अर्ज व अभिलेखावर दाखल केलेल्या दस्तऐवजांचे अवलोकन केले. अर्जदारांकरीता विद्वान विधिज्ञ **श्री. आर. जे. निकस** व अभियोग पक्षाकरीता विद्वान विशेष सहायक सरकारी अभियोक्ता **श्री. आर. आर. चौधरी** यांचा युक्तिवाद ऐकला.

०७) अभिलेखावर दाखल केलेल्या सर्व कागदपत्रांचे अवलोकन केले असता अर्जदार हा जप्त **वाहनाचा** मालक व ताबेदार असल्याचे दिसुन येते सदर **वाहन** पोलीस स्टेशन मेहकर यांनी गुन्हा नोंद क्रमांक ११५/२०२६ मध्ये जप्त केलेले असुन सदर **वाहन** पोलीस ठाणे मेहकर येथे बंद अवस्थेत पडुन आहे. सदर **वाहन** जास्त दिवस बंद अवस्थेत ठेवल्यास ते खराब होण्याची शक्यता नाकारता येत नाही. सदर **वाहन** अर्जदार यांना व्यवसायासाठी तसेच घरघुती कामासाठी आवश्यक आहे. सन्मानीय सर्वोच न्यायालय यांनी General Insurance Council Vs State of AP {2010 (4) SC 141} या प्रकरणामध्ये असे निर्देश दिलेले आहेत की, पोलीसांकडुन एखाद्या प्रकरणात वाहन जप्त केलेले असेल आणि सदर वाहनाचा ताबा मिळविण्यासाठी एखाद्याने अर्ज दाखल केलेला असेल तर असा अर्ज तात्काळ निकाली काढावा. सदर वस्तु पोलीस स्टेशनमध्ये ठेवुन त्याचा काही उपयोग होणार नाही. त्यामुळे अशा प्रकरणामध्ये अर्जदाराकडून यथोचित हमीपत्र घेवुन असा अर्ज न्यायबुध्दीने तात्काळ निकाली काढावा. प्रकरणामधील दाखल केलेला पुरावा त्याचबरोबर सन्माननीय सर्वोच्च न्यायालयाचे वर नमुद न्यायानिर्णयातील निर्देश या आधारावर अर्ज पुढील प्रमाणे निकाली काढण्यात आला.

## आदेश

| | |
|---|---|
| **(१)** | अर्ज मंजूर करण्यात येतो. |
| **(२)** | पोलीस निरिक्षक, पोलीस ठाणे, मेहकर यांना असे निर्देश देण्यात येतात की, अर्जदाराकडून रुपये १०,००,०००/- चा सुपुर्तनामा भरुण घेवुन गुन्हा नोद क्रं.११५/२०२६ मध्ये जप्त असलेली मारुती व्हीटेरा ब्रेझा, झेड.डी.आय+ कार जिचा आर.टी.ओ. पासींग क्र. MH-28-AZ-7778 इंजिन क्रमांक D13A5547801 व चेचीस क्रमांक MA3NYFB1SHL312751 **या वर्णनाचे वाहन** अर्जदाराच्या ताब्यात द्यावी. |
| **(३)** | **(अ.)** अर्जदाराने वरील नमुद **वाहना**मध्ये असा कोणताही बदल करु नये ज्यामुळे सदरील **वाहनाची** ओळख बदलुन जाईल.<br>**(ब.)** अर्जदाराने न्यायालयाच्या पनवानगीशिवाय सदरची **वाहन** कोणासही विक्री, बक्षीस अथवा गहाण करु नये किंवा त्यावर कसलाही बोजा निर्माण करु नये त्याच बरोबर ज्या- ज्या वेळी न्यायालय आदेश करेल त्या-त्या वेळी अर्जदाराचे सदरची **वाहन** न्यायालयात हजर करावे. |
| **(४)** | तपासीक अंमलदार यांना निर्देश देण्यात येतात की, सदरची **वाहन** अर्जदाराच्या ताब्यात देते वेळी त्यांनी सदर **वाहनाचा** सविस्तर पंचनामा तयार करावा तसेच **वाहनाची** रंगीत छायाचित्रे घ्यावीत. |
| **(५)** | तपासीक अंमलदार यांना पुढे असे निर्देश देण्यात येतात की, सदर गुन्हयातील दोषारोपपत्र दाखल करते वेळी दोषारोपत्रासोबत सुपुर्तनामा, **वाहना** चा पंचनामा व छायाचित्रे दाखल करावेत. |

सदर आदेश खुल्या न्यायालयात पारीत करण्यात आला.

स्वा/-

दिनांक. १६/०३/२०२६

(रमाकांत बी. हनवते)

प्रथम वर्ग न्यायादंडाधिकारी, लोणार